Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

## कृपया प्रसिद्धीसाठी

### पार्ले महोत्सवात दिसणारे उर्जावान तरुण म्हणजे महाराष्ट्राचे वैभव - देवेंद्र फडणवीस

मुंबई दि. २८ : पार्ले महोत्सवात येणारी तरुणाई म्हणजे उर्जा असून असे तरुण खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे वैभव आहेत असे गौरव उद्गार माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. भाजपा आमदार पराग अळवणी आयोजित २० व्या पार्ले महोत्सवातील क्रीडा स्पर्धांना दिलेल्या भेटी दरम्यान ते बोलत होते. स्पर्धांमधील खेळाडू हा हरला तरी खचून न जाता पुन्हा मैदानात उतरतो व आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतो. स्पर्धांमधून अशी जिद्द निर्माण होत असून सलग २० वर्षे असे व्यासपीठ उपलब्ध केल्याबद्दल आमदार पराग अळवणी व त्यांच्या टीमचे त्यांनी कौतुकही केले.

पार्ले महोत्सवातील क्रीडा स्पर्धा सुरू असलेल्या स्वांतत्रवीर विनायक दामोदर सावरकर क्रीडा नगरीत देवेंद्र फडणवीस यांचे आगमग होताच खेळाडू व क्रीडापटूनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. मैदानावरील सर्व सामनांमधील प्रत्येक खेळाडूंना स्वतः भेटून त्यांनी हस्तांदोलन करत शुभेच्छा दिल्या तसेच मलखांब मधील सांघिक स्पर्धेतील, बॉक्स क्रिकेट व "सेफ ड्रायवींग" स्पर्धेतील विजेत्यांना त्यांनी पारितोषिकेही दिली.

आपल्या कारकिर्दीत राज्यामध्ये आपण भरीव विकास कार्य सुरु केलीतच त्या सोबत 'सी. एम. चषक' या उपक्रमातून लाखो तरुणांना एक महत्वपूर्ण व्यासपीठ देखील उपल्ब्ध केलेत.त्यामुळेच आज या पार्ले महोत्सवातील उपस्थित क्रीडा रसिकही आपले उत्स्फूर्तपणे स्वागत करत आहेत असे गौरवोद्गार पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आ. पराग अळवणी यांनी देवेंद्र फडनवीसांचे स्वागत करताना काढले.

केवळ पार्ले महोत्सव स्पर्धेत होणाऱ्या 'सेफ ड्रायव्हींग' स्पर्धेत ४८७२ स्पर्धकांनी भाग घेतला असून या प्रसंगी सेफ ड्रायव्हींग बाबत माहिती देण्यात आली. Drive Sung या अँपच्या माध्यमातून ४० पेक्षा अधिक निकषांवर किती सुखरूपपणे वाहन चालवले हे तपासून विजयी घोषित स्पर्धकांना देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

२० व्या पार्ले महोत्सवातील सातव्या दिवशी समूह नृत्य, सोलो डान्स, मलखांब स्पर्धेची सुरुवात, तर कबड्डी, व्हॉली बॉल व बॉक्स क्रिकेट अशा सर्वच 'देखण्या' स्पर्धा सुरु असल्यामुळे कला व क्रीडा रसिकांनी महोत्सवास प्रचंड गर्दी केली होती.